जा. क्र. पीसीएमयु-स्मार्ट/पर्या./संरक्षण/ २०१० /२०२२ दि. ३०.१२.२०२२

# परिपत्रक

**विषय:** स्मार्ट प्रकल्पांतर्गत समुदाय आधारित संस्थांनी (CBO) मूल्य साखळी विकासाचा मंजूर उप-प्रकल्प राबविताना पर्यावरण संरक्षणाकरिता अंगीकारायचा किड व्यवस्थापन आराखड्याबाबत मार्गदर्शक सूचना

**स्मार्ट प्रकल्प अंतर्गत कीड व्यवस्थापन आराखडा:**

जागतिक बँकेच्या नियमानुसार स्मार्ट प्रकल्पास कीड व्यवस्थापनाचे OP 4.09 हे धोरण लागू आहे. त्यामुळे पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) अंतर्गत कीड व्यवस्थापन योजना (Pest Management Plan) तयार करण्यात आला आहे. त्यात एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) पद्धतींवर आधारित उपाय सुचवले आहेत जे कि स्मार्ट अंतर्गत लाभान्वित सीबीओ सदस्यांनी अंगीकारणे अनिवार्य आहे. एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या नियमानुसार शेवटचा पर्याय म्हणून रासायनिक पद्धतींचा वापर करावयाचा झाल्यास केंद्रीय कीटकनाशक मंडळ आणि नोंदणी समिती (CIBRC), भारत सरकारव्दारे परवानगी दिलेल्या कीटकनाशकांचे संपादन, साठवण, हाताळणी आणि वापर सुचवण्यात आला आहे. कीड व्यवस्थापन योजना तयार करताना प्रशिक्षणं आणि माहिती प्रसारनाव्दारे कीटकनाशकांशी संबंधित धोके, सुरक्षित कीटकनाशकांच्या वापरासाठी चांगल्या पद्धती, जैविक नियंत्रणाकरिता सेंद्रिय निविष्ठा इत्यादी बाबतीत प्रकल्पातील संबंधित भागधारकांची एकंदर जागरूकता वाढवण्याचा हेतू ठेवण्यात आला आहे. हि कीड व्यवस्थापन योजना (PIP) प्रकल्पांतर्गत पर्यावरणीय नकारात्मक बाबींवर देखरेख व उपाय योजना करण्याच्या गरजेला अधोरेखित करते. एकंदर कीड व्यवस्थापन योजना बनवताना राज्य शासनाच्या एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनावर भर देण्यात आला आहे. त्याच दिशेने उपरोक्त योजनेचा एक महत्वाचा भाग म्हणून स्मार्ट प्रकल्पात एकात्मिक कीड व अन्नद्रव्य व्यवस्थापन आधारित प्रशिक्षणं व क्षेत्र प्रात्यक्षिकं घेण्यात येत आहेत.

**स्मार्ट प्रकल्प अंतर्गत निर्धारित लक्ष:**

अ. मजूर उप-प्रकल्पात निवडलेल्या सर्व कृषी-उत्पादनांची (१०० %) एकात्मिक कीड व अन्नद्रव्य व्यवस्थापनाची (IPNM) क्षेत्र प्रात्यक्षिके राबवणे.

ब. कृषी मूल्यसाखळी विकास शाळांच्या (VCDS) माध्यमातून सर्व १०० % उत्पादकांचा एकात्मिक कीड व अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या (IPNM) प्रशिक्षणांव्दारे क्षमता विकास करणे.

क. स्मार्ट प्रकल्प अंतर्गत असलेल्या एकूण क्षेत्रापैकी किमान ५० % क्षेत्र एकात्मिक कीड व अन्नद्रव्य व्यवस्थापन (IPNM) पद्धतींखाली आणणे.

उपरोक्त कीड व्यवस्थापन योजना (PMP) राबवताना विविध एकात्मिक व्यवस्थापनाच्या दिशेने मशागतीच्या पद्धती, भौतिक, जैविक, अनुवांशिक किंवा नियामक पद्धती वापरून सुद्धा कीड नियंत्रण न होता पिकाची ETL (Economic Threshold Limits) पातळी ओलांडण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास कीड नियंत्रणाचा शेवटचा पर्याय म्हणून

रासायनिक पद्धतींचा वापर करावा. उपरोक्त परिस्थितीत शेवटचा पर्याय रासायनिक पद्धती म्हणून कीटकनाशकांचा वापर करताना साठवणुकी दरम्यान, कीटकनाशक हाताळताना, फवारणीचे द्रावण तयार करताना, उपकरणांची निवड करताना, फवारणी करताना किंवा फवारणी नंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील रकाण्यात (परिशिष्ट १) दिलेल्या बाबींची काळजी घ्यावी. कीटकनाशक खरेदी करताना उत्पादनांची त्यांच्या विषकारकतेनुसार वर्गवारी विविध रंगी सूचक आकृतींसह पुढील तक्त्यात (परिशिष्ट २) दिली आहे. तसेच भारतात प्रतिबंधित असलेली कीटकनाशके व त्यांची मिश्रणं यांची यादी (परिशिष्ट ३) जोडली आहे. प्रस्तुत मार्गदर्शिकेनुसार प्रकल्पांतर्गत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे याची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

## परिशिष्ट १: कीटकनाशकांच्या सुरक्षित वापरासाठी सूचना

| हे करा | हे करु नका |
|---|---|
| **खरेदी करताना** | |
| ✓ वैध परवाना असलेल्या नोंदणीकृत कीटकनाशक विक्रेत्याकडूनच कीटकनाशके खरेदी करा.<br>✓ विविष्ट क्षेत्रात एका फवारणीसाठी आवश्यक असतील तेवढीच कीटकनाशके खरेदी करा.<br>✓ कीटकनाशकांच्या डबा/पॅकेट्सवर लावलेले मंजूर लेबले तपासून पहा.<br>✓ लेबलवर असलेले बॅच क्रमांक, नोंदणी क्रमांक, उत्पादनाची तारीख/ कालबाह्यता तपासून पहा.<br>✓ डब्यामध्ये/पॅकेटमध्ये व्यवस्थित पॅक केलेले सिलबंद कीटकनाशकेच खरेदी करा. | × फूटपाथवरील विक्रेत्यांकडून किंवा परवाना नसलेल्या व्यक्तीकडून कीटकनाशके खरेदी करू नका.<br>× संपूर्ण हंगामासाठी मोठ्या प्रमाणात कीटकनाशके खरेदी करू नका.<br>× डब्यावर मान्यताप्राप्त लेबल नसलेली कीटकनाशके खरेदी करू नका.<br>× कालबाह्य झालेले कीटकनाशक कधीही खरेदी करू नका.<br>× सीलबांद नसलेल्या, गळती होत असलेल्या डब्यातील/पॅकेटमधील कीटकनाशके खरेदी करू नका |
| **साठवणुकी दरम्यान** | |
| ✓ कीटकनाशके घरापासून दूर ठेवा.<br>✓ मूळ डब्यामध्ये/पॅकेटमध्ये कीटकनाशके ठेवा.<br>✓ कीटकनाशके/तणनाशके स्वतंत्रपणे साठवा.<br>✓ जेथे कीटकनाशके साठवली / ठेवली गेली आहेत, ते क्षेत्र चेतावणी व चिन्हांसहित चिन्हांकित केले जावे.<br>✓ कीटकनाशके मुलांच्या व जनावरांच्या आवाक्याबाहेर ठेवावीत.<br>✓ साठवण ठिकाण थेट सूर्यप्रकाश आणि पावसापासून व्यवस्थित संरक्षित केले पाहिजे. | × घराच्या आवारात कधीही कीटकनाशके ठेवू नका.<br>× मूळ डबा/पॅकेटमधील कीटकनाशक दुसऱ्या भांडयामध्ये ओतुन ठेवू नका.<br>× कीटकनाशके/तणनाशके एकत्र साठवू नका.<br>× मुलांच्या व जनावरांना साठवणुकीच्या ठिकाणी जाऊ देऊ नका.<br>× कीटकनाशकांना थेट सूर्यप्रकाश लागु नये किंवा ती पावसाच्या पाण्यात जाऊ नयेत यासाठी आवश्यक ती काळजी घ्या. |
| **हाताळताना** | |
| ✓ वाहतूक करताना कीटकनाशके इतर पदाथांपासुन वेगळे ठेवा.<br>✓ मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी कीटकनाशके कुशलतेने हाताळावीत. | × अन्न/चारा/इतर खाण्यायोग्य वस्तूंसोबत कधीही कीटकनाशके बाळगू नका/वाहतूक करू नका.<br>× मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी कीटकनाशके डोक्यावर, खांद्यावर किंवा पाठीवर वाहून नेऊ नये. |




| फवारणीचे द्रावण तयार करताना | |
|---|---|
| ✓ नेहमी स्वच्छ पाणी वापरा.<br>✓ संपूर्ण शरीर झाकण्यासाठी संरक्षक कपडे उदा., हातमोजे, फेस मास्क, टोपी, ऍप्रन, पूर्ण पायघोळ इत्यादी वापरा.<br>✓ स्प्रे द्रावणाच्या गळतीपासून नेहमी तुमचे नाक, डोळे, कान, हात इत्यादींचे संरक्षण करा.<br>✓ वापरण्यापूवी कीटकनाशक डबा/पॅकेटच्या लेबलवरील सूचना काळजीपूर्वक वाचा.<br>✓ आवश्यक तेवढेच द्रावण तयार करा.<br>✓ शिफारशीत सांगितलेल्या प्रमाणानुसार फवारणीस कीटकनाशक मात्रा वापरावी.<br>✓ फवारणी करिता टाकी भरताना कीटकनाशकांच्या द्रावणांची गळती टाळा.<br>✓ दाणेदार कीटकनाशकांचा वापर मुळ स्वरूपात करावा. | × गढूळ किंवा साचलेले पाणी वापरू नका.<br>× संरक्षणात्मक कपडे परिधान केल्याशिवाय स्प्रे द्रावण कधीही तयार करू नका.<br>× कीटकनाशक/त्याचे द्रावण शरीराच्या कोणत्याही अवयवांवर पडू देऊ नका.<br>× वापरासाठी डबा/पॅकेटच्या लेबलवरील सूचना वाचणे कधीही टाळू नका.<br>× फवारणीचे शिल्लक राहीलेले द्रावण तयार केल्याच्या २४ तासानंतर कधीही वापरू नका.<br>× ग्रेन्युल्स पाण्यात मिसळू नका.<br>× फवारणीच्या टाकीचा वास घेऊ नका.<br>× शिफारशीपेक्षा जास्त मात्रा वापरू नका ज्यामुळे वनस्पतींवर किंवा पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो.<br>× संपूर्ण फवारणी दरम्यान खाणे, पिणे, धुम्रपान किंवा काही चघळणे टाळा.<br>× आरोग्यावर विपरीत परिणाम होईल अशी कोणतीही क्रिया करू नये. |
| **उपकरणांची निवड** | |
| ✓ योग्य प्रकारची उपकरणे निवडा.<br>✓ योग्य आकाराचे नोझल निवडा.<br>✓ कीटकनाशके आणि तणनाशकांसाठी स्वतंत्र फवारणी यंत्र वापरा. | × गळती होणारे किंवा सदोष उपकरणे वापरू नका.<br>× सदोष/शिफारस नसलेल्या नोझल्स वापरू नका. अडकलेल्या नोझल्स तोंडाने फुंकून स्वच्छ करू नका. त्याऐवजी स्प्रेअरने बांधलेला टूथब्रश वापरा.<br>× तणनाशके आणि कीटकनाशके दोन्हीसाठी एकच फवारणी यंत्र कधीही वापरू नका. |
| **फवारणी करताना** | |
| ✓ शिफारस केलेले डोसप्रमाणे द्रावण तयार करा.<br>✓ वातावरण थंड व वारा स्थिर असताना फवारणी करावी.<br>✓ प्रत्येक फवारणीसाठी शिफारस केलेले स्प्रेअर वापरा.<br>✓ फवारणी वाऱ्याच्या दिशेने करावी.<br>✓ स्प्रे ऑपरेशननंतर, स्प्रेअर आणि बादल्या डिटर्जंट/साबण वापरून स्वच्छ पाण्याने धुवाव्यात.<br>✓ फवारणीनांतर ताबडतोब शेतात जनावरे/कामगारांना पाठवणे टाळावे. | × शिफारस केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त डोस फवारू नका.<br>× कडक उन्हात किंवा जोरदार वाऱ्याच्या परिस्थितीत फवारणी करू नका.<br>× पाऊस पडण्यापूवी आणि पाऊस पडल्यानांतर लगेच फवारणी करू नका.<br>× इमल्सिफायेबल कॉन्सन्ट्रेट फॉर्म्युलेशनचा वापर बॅटरीवर चालणाऱ्या ULV स्प्रेअरने फवारणीसाठी करू नये.<br>× वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नका.<br>× कीटकनाशके मिसळण्यासाठी वापरण्यात येणारा डबा आणि बादल्या पूर्णपणे धुतल्यानंतरही कधीही घरगुती कामासाठी वापरू नयेत. |

| फवारणी केल्यानंतर | |
|---|---|
| ✓ फवारणी नंतर शिल्लक द्रावणाची सुरक्षित - नापीक/विलग क्षेत्रामध्ये नेऊन विल्हेवाट लावावी. | × फवारणीचे उरलेले द्रावण तलावात, तलावाजवळ किंवा पाण्यात टाकु नये. |
| ✓ वापरलेले/रिकामे डबे/पॅकेट दगड/काठीने ठेचुन पाण्याच्या स्त्रोतांपासून दूर जमिनीत खोल गाडुन टाकावेत. | × कीटकनाशकांचे रिकामे डबे/पॅकेट इतर वस्तू साठवण्यासाठी पुन्हा वापरू नयेत. |
| ✓ खाणे/धूम्रपान करण्यापूवी हात आणि चेहरा स्वच्छ पाणी आणि साबणाने धुवा. | × फवारणीनंतर कपडे धुण्यापूर्वी आणि आंघोळ करण्यापूवी कधीही खाऊ/धुम्रपान करू नका. |
| ✓ विषबाधाची लक्षणे दिसल्यावर प्रथमोपचार करा तसेच रिकामा डबा/पॅकेट सोबत घेऊन डॉक्टरांना दाखवा. | × विषबाधाची लक्षणे डॉक्टरांना न दाखवून धोका पत्करू नका कारण त्यामुळे रुग्णाच्या जीवाला धोका होऊ शकतो. |

**माहितीचा स्त्रोत :** कृषी विभागाची अधिकृत वेबसाईट

https://krishi.maharashtra.gov.in/ शेतकरी कॉर्नर (कट्टा) - किटकनाशके - करा व करू नका

## परिशिष्ट २: कीटकनाशक उत्पादनांची विषकारकतेनुसार वर्गवारी

| लेबल मधील निर्देशित त्रिकोण | लेबलचा रंग | विषकारकता |
|---|---|---|
|  | लाल लेबल | अतिशय जास्त विषकारक |
|  | पिवळा लेबल | जास्त विषकारक |
|  | निळा लेबल | मध्यम विषकारक |
|  | हिरवा लेबल | कमी विषकारक |

**माहितीचा स्त्रोत :** कृषी विभागाची अधिकृत वेबसाईट

https://krishi.maharashtra.gov.in/ शेतकरी कॉर्नर (कट्टा) - किटकनाशके - विष तीव्रता चिन्हे

## परिशिष्ट ३: जागतिक आरोग्य संघटने (WHO) द्वारे वर्गीकृत अनुज्ञेय नसलेल्या कीटकनाशकांची यादी (Class Ia, Ib & II)

| | | | |
|---|---|---|---|
| **1. EXTREMELY HAZARDOUS (Class Ia)**<br>**active ingredients (technical grade) of pesticides** | | | |
| Aldicarb [ISO] | Chlormephos [ISO] | Ethoprophos [ISO] | Phenylmercury acetate [ISO] |
| Brodifacoum [ISO] | Chlorophacinone [ISO] | Flocoumafen | Phorate [ISO] |
| Bromadiolone [ISO] | Difenacoum [ISO] | Hexachlorobenzene [ISO] | Phosphamidon |
| Bromethalin [ISO] | Difethialone [ISO] | Mercuric chloride [ISO] | Sodium fluoroacetate [C] |
| Calcium cyanide [C] | Diphacinone [ISO] | Mevinphos [ISO] | Sulfotep [ISO] |
| Captafol [ISO] | Disulfoton [ISO] | Parathion [ISO] | Tebupirimfos [ISO*] |
| Chlorethoxyfos [ISO] | EPN | Parathion-methyl [ISO] | Terbufos [ISO] |
| **2. HIGHLY HAZARDOUS (Class Ib)**<br>**active ingredients (technical grade) of pesticides** | | | |
| Acrolein [C] | Beta-cyfluthrin [ISO] | Isoxathion [ISO] | Propetamphos [ISO] |
| Allyl alcohol [C] | Zeta-cypermethrin [ISO] | Lead arsenate [C] | Sodium arsenite [C] |
| Azinphos-ethyl [ISO] | Demeton-S-methyl [ISO] | Mecarbam [ISO] | Sodium cyanide [C] |
| Azinphos-methyl [ISO] | Dichlorvos [ISO] | Mercuric oxide [ISO] | Strychnine [C] |
| Blasticidin-S | Dicrotophos [ISO] | Methamidophos [ISO] | Tefluthrin |
| Butocarboxim [ISO] | Dinoterb [ISO] | Methidathion [ISO] | Thallium sulfate [C] |
| Butoxycarboxim [ISO] | DNOC [ISO] | Methiocarb [ISO] | Thiofanox [ISO] |
| Cadusafos [ISO] | Edifenphos [ISO] | Methomyl [ISO] | Thiometon [ISO] |
| Calcium arsenate [C] | Ethiofencarb [ISO] | Monocrotophos [ISO] | Triazophos [ISO] |
| Carbofuran [ISO] | Famphur | Nicotine [ISO] | Vamidothion [ISO] |
| Chlorfenvinphos [ISO] | Fenamiphos [ISO] | Omethoate [ISO] | Warfarin [ISO] |

| | | | |
|---|---|---|---|
| 3-Chloro-1,2-propanediol [C] | Flucythrinate [ISO] | Oxamyl [ISO] | Zinc phosphide [C] |
| Coumaphos [ISO] | Fluoroacetamide [C] | Oxydemeton-methyl [ISO] | |
| Coumatetralyl [ISO] | Furathiocarb | Paris green [C] | |
| Cyfluthrin [ISO] | Heptenophos [ISO] | Pentachlorophenol [ISO] | |
| **3. MODERATELY HAZARDOUS (Class II)** **active ingredients (technical grade) of pesticides** | | | |
| Acephate [ISO] | DDT [ISO] | Guazatine | Piperophos [ISO] |
| Acifluorfen [ISO] | Deltamethrin [ISO] | Haloxyfop | Pirimicarb [ISO] |
| Alachlor [ISO] | Diazinon [ISO] | HCH [ISO] | Pirimiphos-methyl [ISO] |
| Alanycarb [ISO] | Dicamba [ISO] | Hexazinone [ISO] | Prallethrin [ISO] |
| Allethrin [ISO] | Dichlorobenzene [C] | Hydramethylnon | Prochloraz [ISO] |
| Ametryn [ISO] | Dichlorophen [ISO] | Imazalil [ISO] | Profenofos [ISO] |
| Amitraz [ISO] | Dichlorprop [ISO] | Imidacloprid [ISO] | Propachlor [ISO] |
| Anilofos [ISO] | Diclofop [ISO] | Iminoctadine [ISO] | Propanil [ISO] |
| Azaconazole | Dicofol [ISO] | Indoxacarb [ISO] | Propiconazole [ISO] |
| Azamethiphos [ISO] | Difenoconazole [ISO] | Ioxynil [ISO] | Propoxur [ISO] |
| Azocyclotin [ISO] | Difenzoquat [ISO] | Ioxynil octanoate [(ISO)] | Prosulfocarb [ISO] |
| Bendiocarb [ISO] | Dimepiperate [ISO] | Iprobenfos | Prothiofos [ISO] |
| Benfuracarb [ISO] | Dimethachlor [ISO] | Isoprocarb [ISO] | Pyraclofos [ISO] |
| Bensulide [ISO] | Dimethipin [ISO] | Isoprothiolane [ISO] | Pyrazophos [ISO] |
| Bensultap [ISO] | Dimethenamid [ISO] | Isoproturon [ISO] | Pyrazoxyfen [ISO] |
| Bentazone [ISO] | Dimethylarsinic acid [C] | Isouron [ISO] | Pyrethrins [C] |
| Bifenthrin | Dimethoate [ISO] | Lambda-cyhalothrin | Pyridaben [ISO] |
| Bilanafos [ISO] | Diniconazole [ISO] | MCPA [ISO] | Pyridaphenthion |

| | | | |
|---|---|---|---|
| Bioallethrin [C] | Dinobuton [ISO] | MCPA-thioethyl [ISO] | Pyroquilon [ISO] |
| Bromoxynil [ISO] | Dinocap [ISO] | MCPB [ISO] | Quinalphos [ISO] |
| Bromuconazole | Diphenamid [ISO] | Mecoprop [ISO] | Quinoclamine [ISO] |
| Bronopol | Diquat [ISO] | Mecoprop-P [ISO] | Quizalofop |
| Butamifos [ISO] | Dithianon [ISO] | Mefluidide [ISO] | Quizalofop-p-tefuryl [ISO] |
| Butralin [ISO] | Dodine [ISO] | Mepiquat [ISO] | Rotenone [C] |
| Butroxydim [ISO] | Endosulfan [ISO] | Mercurous chloride [C] | Simetryn [ISO] |
| Butylamine [ISO] | Endothal-sodium [(ISO)] | Metalaxyl [ISO] | Sodium chlorate [ISO] |
| Carbaryl [ISO] | EPTC [ISO] | Metaldehyde [ISO] | Spiroxamine [ISO] |
| Carbosulfan [ISO] | Esfenvalerate [ISO] | Metamitron [ISO] | Sulfluramid [ISO] |
| Cartap [ISO] | Ethion [ISO] | Metam-sodium [(ISO)] | 2,3,6-TBA [ISO] |
| Chloralose [C] | Fenazaquin [ISO] | Metconazole [ISO] | TCA [ISO] (acid) |
| Chlordane [ISO] | Fenitrothion [ISO] | Methacrifos [ISO] | Tebuconazole [ISO] |
| Chlorfenapyr [ISO] | Fenobucarb | Methasulfocarb [ISO] | Tebufenpyrad [ISO] |
| Chlormequat (chloride) [ISO] | Fenothiocarb [ISO] | Methylarsonic acid [ISO] | Tebuthiuron [ISO] |
| Chloroacetic acid [C] | Fenpropidin [ISO] | Methyl isothiocyanate [ISO] | Terbumeton [ISO] |
| Chlorphonium chloride [ISO] | Fenpropathrin [ISO] | Metolcarb [ISO] | Tetraconazole [ISO] |
| Chlorpyrifos [ISO] | Fenpyroximate [ISO] | Metribuzin [ISO] | Thiacloprid |
| Clomazone [ISO] | Fenthion [ISO] | Molinate [ISO] | Thiobencarb [ISO] |
| Copper hydroxide [C] | Fentin acetate[(ISO)] | Myclobutanil | Thiocyclam [ISO] |
| Copper oxychloride [C] | Fentin hydroxide[(ISO)] | Nabam [ISO] | Thiodicarb [ISO] |
| Copper sulfate [C] | Fenvalerate [ISO] | Naled [ISO] | Thiram [ISO] |
| 4-CPA [ISO] | Ferimzone [ISO] | 2-Napthyloxyacetic acid [ISO] | Tralkoxydim [ISO] |
| Cuprous oxide [C] | Fipronil | Nitrapyrin [ISO] | Tralomethrin |

| | | | |
|---|---|---|---|
| Cyanazine [ISO] | Fluchloralin [ISO] | Nuarimol [ISO] | Triadimefon [ISO] |
| Cyanophos [ISO] | Flufenacet [ISO] | Octhilinone [ISO] | Triadimenol [ISO] |
| Cyhalothrin [ISO] | Fluoroglycofen | Oxadixyl | Triazamate [ISO] |
| Cyhexatin [ISO] | Flurprimidol [ISO] | Paclobutrazol [ISO] | Trichlorfon [ISO] |
| Cymoxanil [ISO] | Flusilazole | Paraquat [ISO] | Triclopyr [ISO] |
| Cypermethrin [ISO] | Flutriafol [ISO] | Pebulate [ISO] | Tricyclazole [ISO] |
| Alpha-cypermethrin [ISO] | Fluxo fenim [ISO] | Pendimethalin [ISO] | Tridemorph [ISO] |
| Cyphenothrin [(1R)-isomers] [ISO] | Fomesafen [ISO] | Permethrin [ISO] | Triflumizole |
| Cyproconazole | Fuberidazole [ISO] | Phenthoate [ISO] | Uniconazole [ISO] |
| 2,4-D [ISO] | Furalaxyl [ISO] | Phosalone [ISO] | XMC |
| Dazomet [ISO] | Gamma-HCH [ISO], Lindane | Phosmet [ISO] | Xylylcarb |
| 2,4-DB | Glufosinate [ISO] | Phoxim [ISO] | Ziram [ISO] |

## परिशिष्ट :४ भारतात प्रतिबंधित असलेली कीटकनाशके व त्यांची मिश्रणं

| | | | |
|---|---|---|---|
| **A. वापरास प्रतिबंधित परंतु उत्पादन व निर्यात केले जाणारे कीटकनाशक (Banned for use but manufactured and exported)** | | | |
| Nicotin Sulfate | | Captafol 80 percent powder | |
| **B. बंदी घातलेली मिश्रणं (Formulation banned)** | | | |
| Methomyl 24 percent L | Methomyl 12.5 percent L | Phosphamidon 85 percent SL | Carbofuron 50 percent SP |
| **C. मान्यता रद्द करण्यात आलेली कीटकनाशके (Pesticides Withdrawn)** | | | |
| Dalapon | Paradichloro benzene | Simazine | Warfarin |
| Ferbam | Formothion | Nickel Chloride | |
| **D. नोंदणी नाकारलेली कीटकनाशके (Pesticides Refused Registration)** | | | |
| Methoxyethyl Mercuric Chloride | Thiodemeton/ Disulfoton | Ammonium Sulphamate | Calcium Arsonate |
| EMP | Azinphos Ethyl | Leptophos | Monochrotophos |
| Azinphos Methyl | Binapacryl | Aluminium Phosphide | Endosulfan |
| Lead Arsonate | Dicrotophos | DDT | Fenitrothion |
| Mevinphos | Mephosfolan | Lindane | Diazinon |
| 2,4,5T | Fentin Acetate | Methyl Bromide | Fenthion |
| Carbophenothion | Fentin Hydroxide | Methyl Parathion | Dazomet |
| Vamidothion | Chinomethionate | Sodium Cyanide | |
| **E. उत्पादन, आयात आणि वापरासाठी बंदी घातलेली कीटकनाशके (Banned for Manufacture, import and Use)** | | | |
| Aldrin | Endrin | Pentachlorophenol | Chlorobenzilate |
| Benzene Hexachloride | Ethyl Mercury Chloride | Pentachloro Nitrobenzene | Trichloro Acetic Acid |
| CalciumCyanide | EthylParathion | Chlordane | Maleic Hydrazide |
| Phenyl Mercury Acetate | Chlorofenvinphos | Sodim Methane Arsonate | Ethylene Dibromide |
| Copper Acetoarsenite | Menazone | Tetradifon | Dieldrine |
| Clbromochloropropane | Nitrofen | Toxaphene | Metoxuron |
| Paraquat Dimethyl Sulphate | Heptachlor | Aldicarb | Dibromochloropropane |

**माहितीचा स्त्रोत :** पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF), स्मार्ट प्रकल्प (पान क्रमांक २६०)

ज्ञानेश्वर बोटे
अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट

**प्रत** - माहिती व कार्यवाहीस्तव,

१. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषी, माविम, MSRLM, VSTF

२. नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषी, माविम, MSRLM, VSTF

प्रकल्प समन्वय आणि अंमलबजावणी कक्ष, शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ (महाराष्ट्र)
दूरभाष : ०२० २५६५६५७७/८ वेबसाईट : www.smart-mh.org ई मेल: pcmu.smart@gmail.com